संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# चर्चा एका चोरीची आणि घुसखोरीची

निवडणुका संपल्या, निकाल लागले. काही मंत्र्यांचा शपथविधी झाला. इकडे दोन्ही काँग्रेसमध्ये पराभवाची कारणे शोधण्याचा प्रयत्न झाला. या सगळ्या घटना घडत असताना त्यानंतरच्या कालावधीत महाराष्ट्रातल्या राजकीय वर्तुळात आश्चर्य वाटावे, अशा दोन घटनाही घडल्या.या घटनांना प्रसिध्दी मिळाली; पण त्याचे रहस्य किंवा गूढ अजूनही कायम आहे. त्यातली एक घटना म्हणजे निवडणूक प्रचाराच्या काळात राष्ट्रीय काँग्रेसच्या दहा कोटी रुपये निधीची चोरी झाली. दादरच्या पक्षाच्या कार्यालयाजवळ असलेल्या एका फ्लॅटमध्ये काही उमेदवारांना प्रचारासाठी पक्षातर्फे हा निधी दिला जाणार होता; परंतु तो उमेदवारांपर्यंत पोहचलाच नाही. त्याच्या आधीच या दहा कोटीच्या निधीचा चोरट्यांनी परस्पर पोबारा केला. निवडणुकीचा प्रचार संपून तब्बल महिन्यानंतरही बाब उजेडात आली. अजूनही ही रक्कम कोणी पळवली. याचा थांगपत्ता लागलेला नाही. रक्कम चोरीला गेली याबद्दल काही शंका नाही. तर दुसरी घटना म्हणजे देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीच्या सोहळ्यामध्ये सगळ्या प्रकारची सुरक्षा व्यवस्था भेदून एक अनोळखी कार्यकर्ता थेट व्यासपीठावर जाऊन धडकला. पंतप्रधानांपासून ते मुख्यमंत्र्यांसोबतचे त्याचे फोटो प्रसिध्द झाले. त्याने व्हॉट्सअपवर हे फोटो प्रसिध्द केले. स्वत:ची प्रसिध्दी करण्याचा प्रयत्न केला. पण तो त्याच्या अंगाशी आलेला दिसतो. चांगल्या सुटाबुटात असलेल्या किंवा आपण पक्षातले कसे हायप्रोफाईल नेते आहोत, अशा थाटात वावरणाऱ्या व्यक्तीला पोलिसांनी अटक केली आहे. त्याची चौकशीही सुरू आहे. परंतु ही व्यक्ती सुरक्षा व्यवस्था भेदून कशी काय व्यासपीठापर्यंत पोहचली. याचे गूढ अद्याप उकललेले नाही. या व्यक्तीने भाजपाचे अध्यक्ष अमित शहा, केंद्रीय कायदा मंत्री रविशंकर प्रसाद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एवढेच नव्हे तर पंतप्रधान मोदी यांच्याशी हस्तांदोलन करतानाचे फोटो प्रसिध्द झाले आहेत. पोलिसांनी केलेल्या चौकशीतून अजूनही ही व्यक्ती नेमकी भाजपाचा कार्यकर्ता आहे का, की तिला तिथपर्यंत पोहचण्यासाठी भाजपातल्याच कुठल्या तरी नेत्याने मदत केली हे अजून उघड झाले नाही. आणि म्हणूनच निवडणुकीनंतरची ही काँग्रेसच्या कार्यालयातली चोरी आणि शपथविधी कार्यक्रमातली घुसखोरी या दोन्ही गोष्टींना प्रसिध्दी तर मिळालीच. परंतु त्याचे रहस्य अजूनही उलगडलेले नाही.राजकीय वातावरणामध्ये अनेक घटना घडत असतात. त्यातही निवडणुकीच्या काळात वातावरण सतत बदलत असते. मुबलक पैसा आणि कार्यकर्त्यांची मुबलक गर्दी असे त्यावेळचे वातावरण असते. कोण कोणाला कशी मदत करीत आहे की, अडचणीत आणीत आहे हे ठरवणेदेखील कठीण होऊन जाते. या दोन्ही घटना अशाच प्रकारात मोडणाऱ्या ठरतात.

### चोरीमागे कोणाचा हात

आपल्याकडे निवडणुकांमध्ये पैशांचा महापूर असतो. निवडणूक काळात काळा पैसा असा काही उफाळून वर येतो. की, गावागावापर्यंत तो पोहचवला जातो. त्याच्या जोरावर मते विकत घेण्याचा, निवडणूक जिंकण्याचा आटोकाट प्रयत्न होतो. या काळामध्ये संपूर्ण राज्यात वेगवेगळ्या पक्षांच्या वेगवेगळ्या वाहनांमधून तब्बल पंचवीस कोटी रुपये पोलिसांनी पकडले असावेत. यावरून किती प्रचंड रोख किंवा बेहिशोबी रक्कम राज्यभर वाटली गेली याचा सहज अंदाज येतो. एकीकडे निवडणूक आयोगाने आचारसंहिता लागू केलेली असते. प्रत्येक पक्षाने आणि उमेदवाराने किती खर्च करायचा याची मर्यादा घालून दिलेली असते; परंतु कागदोपत्री हे हिशेब दाखवले जातात. प्रत्यक्षात मात्र त्याच्या पाचपट पैसा निवडणुकीत वाटला जातो. आपण लोकशाहीच्या मूल्यांची एकीकडे चर्चा करतो. कायदा, घटना याबाबतीत बरीच मोठमोठी मते मांडली जातात. चर्चा होतात. प्रत्यक्षात याच मूल्यांची धूळधाण हेच राजकीय पक्ष उडवीत असतात. एकेका मताची किंमत ठरवली जाते. आणि त्या व्यक्तीच्या कार्यक्षमतेऐवजी पैशाच्या जोरावर निवडणुका लढवल्या जातात. निवडणूक म्हटल्यानंतर खर्च होणे स्वाभाविक आहे. परंतु त्याबाबतही काहीतरी मर्यादा असली पाहिजे. या वेळेला प्रथमच इतक्या प्रचंड प्रमाणावर रोकड जप्त होण्याचा प्रकार महाराष्ट्रात घडला आणि प्रथमच एखाद्या राजकीय पक्षाच्या मालकीची एवढी मोठी रक्कम गायब होण्याचीही घटना घडली. या संदर्भामध्ये काँग्रेसच्या नेत्यांकडून उलटसुलट विधाने होत आहेत. त्यामुळे नेमकी माहिती अजूनही समोर आलेली नाही. पोलिसांकडूनही त्याबाबतची योग्य ती माहिती दिली गेलेली नाही. हा सगळाच राजकीय मामला असल्यामुळे याबाबतची वस्तुस्थिती बाहेर येण्याची शक्यता फारच कमी आहे, अशी प्रकरणे बाहेर येण्याऐवजी दडपण्याचेच काम होत असते. परंतु दीड दोन लाखांची रक्कम असेल तर गोष्ट वेगळी होती. ज्यावेळेला दहा कोटींचा पक्षाचा निधी गूढरित्या गायब होतो, त्यावेळेला त्याचे महत्त्व आपोआप वाढते. ते दहा कोटी कुठून आले आणि कुठे जाणार होते. निवडणूक आयोगाला त्याचा हिशेब दिला गेला होता का, जरी त्यातली रक्कम उमेदवारांना प्रचारासाठी दिली जाणार होती, मग तसा खुलासा निवडणूक आयोगाने केला होता का, असे अनुषंगिक प्रश्न उपस्थित होतात. हा जर पैसा बेहिशेबी पध्दतीने आला असेल आणि त्याची चोरी झाली असेल तर त्याचा आणखी गवगवा होऊ नये, अशीच काळजी काँग्रेसकडून घेतली जाईल. कारण तो सगळाच मामला बेहिशेबी असल्यामुळे त्याला चोरीही म्हणता येत नाही. अशी काँग्रेसची अवस्था झाली आहे. तिथे या निधीच्या चोरीपेक्षाही निवडणुकांमध्ये इतक्या प्रचंड प्रमाणावर रोख रकमा आणून ठेवल्या जातात आणि त्याचे वाटप केले जाते, हे जास्त धक्कादायक ठरते. लोकशाहीच्या मूल्यांचा इथेच सर्वात मोठा पराभव होतो.

### त्या कार्यकर्त्याचे लागेबांधे तपासा

या चोरीचे गूढ उकलेल की नाही हे सांगता येत नाही. तसेच शपथविधी सोहळ्यात घेतलेल्या व्यक्तीचे लागेबांधे कोणाशी आहेत याचाही फार उलगडा होण्याची फारशी शक्यता दिसत नाही. या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार असल्यामुळे सुरक्षा व्यवस्था अधिक काटेकोर केली गेली होती; परंतु त्या सगळ्या यंत्रणांना काट्यावर ठेवून हा स्वयंघोषित भाजपाचा कार्यकर्ता सराईतपणे तिथे वावरत होता. आता तो तिथे कसा घुसला याची नुसती चर्चा सुरू आहे. कोणतीही बाहेरची व्यक्ती इतक्या सहजपणे सुरक्षा व्यवस्था भेदून तिथे पोहचू शकत नाही. तिचे भाजपातल्याच कुठल्या तरी वरिष्ठ नेत्याशी काही ना काही संबंध असले पाहिजेत. अन्यथा त्या व्यक्तीलासुध्दा अचानकपणे तिथे जाण्याची आवश्यकताही वाटली नसती. मात्र सध्याच्या हल्लीच्या घातपाती कृत्यांच्या पार्श्वभूमीवर या घुसखोरीचा पंचनामा केला तर त्याचे गांभीर्य अधिक वाढते. कदाचित पोलिसांच्या सुरक्षा व्यवस्थेत कुठे आणि कशा त्रुटी आहेत, हे शोधण्याचे कामही यानिमित्ताने झाले असावे. पंतप्रधानांच्या सुरक्षा व्यवस्थेचा विचार केला तर त्यामध्ये खूप मोठी त्रुटी राहिल्याचे यानिमित्ताने दिसून येते.काँग्रेस कार्यालयातल्या चोरीप्रमाणेच या घुसखोरीचे रहस्य खरे तर लोकांसमोर आले पाहिजे. कोण कोणाला वाचवत आहे किंवा कोण कोणाला संरक्षण देत आहे. याचा उलगडा यानिमित्ताने होऊ शकतो. दोन्ही घटना समोर तर आल्या आहेत. ज्या दोन्ही घटनांना प्रसिध्दी मिळवून चर्चाही सुरू आहे. पोलिसांकडून दोन्ही गोष्टींचा तपासही सुरू असल्याचे सांगितले जाते. पण या चोरीमागचे किंवा घुसखोरीमागचे हात आणि हेतू कोणाचे आहेत. हे रहस्य अजूनही कायम आहे.